१. **सोडेक्सो मील पास म्हणजे काय?**

सोडेक्सो मील पास हा पूर्णपणे डिजिटल मील लाभ निराकरण आहे. हे कार्ड ५-वर्षांच्या वैधतेसह मिळते आणि केवळ सोडेक्सोशी संलग्न व्यापारी आउटलेटमध्ये अन्न आणि अल्कोहोल व्यतिरिक्त पेयांच्या खरेदीसाठी स्वीकारले जाते.

२. **सोडेक्सो मिल पास वर किती रक्कम लोड केली जाईल?**

सोडेक्सो मिल पास वर तुमच्या एचआरने निश्चित केलेली रक्कम लोड केली जाईल. कृपया तुमच्या एचआर कडून सोडेक्सो मिल कार्डाच्या मासिक लोड मूल्याची माहिती करून घ्या.

३. **मला हे कार्ड मिळाल्यावर मी लगेच माझ्या कार्डचा वापर करू शकेन का?**

सुरक्षेच्या कारणांसाठी कार्ड निष्क्रिय मोडमध्ये पाठविले जाते. कार्ड वापरण्यापुर्वी ते ॲक्टिवेट करणे आवश्यक आहे.

४. **फमी माझा सोडेक्सो मील पास कसा ॲक्टिवेट करू?**

- सोडेक्सो मील पास सुरक्षेच्या कारणांसाठी निष्क्रिय मोडमध्ये पाठविला जातो. उपयोग करण्यापुर्वी कार्ड ॲक्टिवेट करणे आवश्यक आहे जे तुमच्या कार्डासोबत दिल्या जाणाऱ्या स्वागत किटमध्ये नमूद करण्यात आलेल्या काही सोप्या सूचनांचे अनुसरण करून करता येऊ शकते.
- कार्ड एक्टिवेशन पोर्टल https://activation.sodexobrs.com येथे देऊन तुमचे कार्ड ऑनलाइन ॲक्टिवेट करा.
  - ○ तुमचा अधिकृत नोंदणीकृत ईमेल ॲड्रेस / मोबाइल नंबर नमूद करा
  - ○ १२-आकडी कार्ड संदर्भ क्रमांक नमूद करा (स्वागत पत्रावर नमूद केलेला)
  - ○ 'गेट ॲक्टिवेशन कोड' वर क्लिक करा.
  - ○ केवायसी पूर्ण करण्यासाठी अधिकृतपणे वैध दस्तऐवज * तपशील पदान करा
  - ○ 'ॲक्टिवेशन कोडट नमूद करा (ईमेल / एसएमएस वर मिळालेला)
  - ○ ओटीपीवर आधारित मोबाइल नंबर पडताळणी पूर्ण करा.
  - ○ 'कार्ड ॲक्टिवेट करा' वर क्लिक करा

  अधिकृतपणे वैध दस्तऐवजांमध्ये पासपोर्ट, वाहनचालक परवाना, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड यांचा समावेश आहे. पॅनकार्डच्या बाबतीत, बँक स्टेटमेन्ट, वीज बिल, लँडलाइन बिल (मोबाईल नाही), लीव ॲण्ड़ लायसन्स / घराचा भाडे करारनामा यासारखे पत्याच्या अधिक पुराव्याचे दस्तऐवज सादर करावेत.

५. **मी सोडेक्सो मील कार्डावर किती बचत करू शकेन?**

तुम्ही सोडेक्सो मील कार्डावर दर वर्षी कर आणि खास ऑफर्सवर रू.२२,००० पर्यंत बचत करू शकता. तुम्ही http://sodexo.live/savings येथे सोडेक्सो मील कार्डावर होणाऱ्या बचतीचा हिशोब करू शकता.

६. **मी माझा सॉडेक्सो मिल पास झेटा मोबाईल ॲपशी कसा जोडू शकतो? झेटा मोबाईल ॲप वापरण्याचे काय फायदे आहेत?**

- कर्मचाऱ्यांना अनेक फायदे उपलब्ध करून देण्यासाठी सोडेक्सो मील पास द्वारा झेटा डिजिटल प्लॅटफॉर्मची सांगड घालण्यात आली आहे. तुमच्या स्मार्टफोनवर झेटा ॲप डाउनलोड करण्याचे फायदे खालील प्रमाणे आहेत:
- **पैसे भरण्याचे अनेक मार्ग:** तुमच्या सोडेक्सो मील पासचा ऑनलाइन आणि ऑफलाइन फुड स्टोअर्सवर उपयोग करा आणि यांचा वापर करुन पैसे भरा:
  - ○ क्यूआर कोड – मर्चन्ट आउटलेटवर फक्त क्यूआर कोड स्कॅन करा आणि रक्कम पंच करा

- ○ शॉप आयडी – व्यापाऱ्याच्या दुकानाची आयडी नमूद करा आणि पैसे भरा
- ○ झेटा कोड – ''झेटा कोड'' वर क्लिक करा, स्क्रीनवर टॅपकरून ओटीपी जनरेट करा, पैसे देण्यासाठी विक्रेत्याला ओटीपी द्या आणि तुमचे काम झाले!
- ○ केवायसी पूर्ण करण्यासाठी अधिकृतपणे वैध दस्तऐवज * तपशील सादर करा
- ○ ॲक्टिवेशन कोड नमूद करा (ईमेल / एसएमएस वर मिळालेला)
- ○ ओटीपीवर आधारित मोबाइल नंबर पडताळणी पूर्ण करा.
- ○ 'कार्ड ॲक्टिवेट करा' वर क्लिक करा

- **सुपरपिन –** तुमचा स्टॅटिक पिन विसरलात तरी काही हरकत नाही कारण तुम्हाला वाचविण्यासाठी तुमच्यापाशी सुपरपिन आहे. सुपरपिन हा एक डायनॅमिक पिन आहे जो तुमच्या ॲपवर दर दोन मिनिटांनी तयार केला जातो
- **संघटित फुड ॲप्स –** संघटित फुड ऑर्डर करण्याच्या ॲप्सद्वारे थेट खरेदी करा
- **मर्चंट आउटलेट्स –** ॲपवरील सोडेक्सो मर्चन्ट डिरेक्टरी थेट उपलब्ध करून घ्या
- **विशेष ऑफर आणि सवलत –** खास ऑफर आणि सवलतींचा लाभ घ्या
- **कार्ड ब्लॉक आणि अनब्लॉक करा –** तुमच्या गरजेनुसार कार्ड ब्लॉक किंवा अनब्लॉक करता येते
- **खर्चावर लक्ष ठेवा –** खर्च आणि क्रेडिटवर रिअल–टाइम इन–ॲप नोटिफिकेशन
- **ट्रान्झॅक्शन इतिहास मिळवा –** चालता चालता व्यवहाराचा इतिहास मिळवा

  अधिकृतपणे वैध दस्तऐवजांमध्ये पासपोर्ट, वाहनचालक परवाना, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड यांचा समावेश आहे. पॅनकार्डच्या बाबतीत, बँक स्टेटमेन्ट, वीज बिल, लँडलाइन बिल (मोबाईल नाही), लीव ॲण्ड लायसन्स / घराचा भाडे करारनामा यासारखे पत्याच्या अधिक पुराव्याचे दस्तऐवज सादर करावेत.

**७. माझे कार्ड ट्रान्झॅक्शन पिनद्वारे सुरक्षित आहे का?**

होय, सोडेक्सो मील पास पिनवर आधारित कार्ड आहे. कार्डच्या स्वागत किटचा भाग म्हणून तुम्हाला तुमचा स्टॅटिक पिन मिळेल. तुम्ही झेटा ॲप वापरुन स्वतःच सुपरपिन जनरेट करू शकता. हा सुपरपिन डायनॅमिक आहे आणि पत्येक दोन मिनिटांनी तयार होतो.

**८. मला स्टॅटिक पिन लक्षात ठेवण्याची गरज आहे काय?**

तुम्ही जर झेटा ॲप डाउनलोड केले नसेल तर तुम्हाला तुमचा पिन लक्षात ठेवणे आवश्यक आहे. तुम्ही जर झेटा ॲप डाउनलोड केले असेल तर तुम्ही फक्त सुपरपिन वैशिष्ट्य वापरु शकता.

**९. मला हा पिन लक्षात ठेवणे आवश्यक आहे?**

होय, तुम्हाला कार्ड पिन लक्षात ठेवणे आवश्यक आहे कारण तुम्ही जेव्हा खरेदीचा व्यवहार कराल तेव्हा हा पिन टाकणे आवश्यक आहे.

**१०. माझ्या खरेदीसाठी आणि लोड व्यवहारांसाठी मला एसएमएस अलर्ट मिळेल का?**

होय, तुम्हाला तुमच्या खरेदी आणि लोड व्यवहारासाठी सोडेक्सोकडून एसएमएस अलर्ट मिळेल. एसएमएस अलर्ट मिळविण्यासाठी तुमचा मोबाईल नंबर सोडेक्सोकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. जर तुमच्या नियुक्तकांनी तुमचा मोबाईल नंबर दिला नसेल तर तुम्ही ॲक्टिवेशन पोर्टलवर कार्ड ॲक्टिवेशन करताना सोडेक्सोकडे त्याची नोंदणी करु शकता. तुम्ही

झेटा ॲपवर देखील तुमचा मोबाइल नंबर नमूद करू शकता. तुम्हाला चांगली सेवा देण्यास मदत करण्यासाठी कृपया ह्या माहितीत सुधारणा करा.

**११. सोडेक्सो मील पाससाठी किती शुल्क आकारले जाते?**

सोडेक्सो मील पासवर केलेल्या खरेदीचाय व्यवहारांवर कोणतेही शुल्क लागू नाहीत.

**१२. सोडेक्सो मील पास वापरताना कोणते कोणते शुल्क लागू आहे?**

कार्डधारकांना सोडेक्सो मील पासच्या सेवांचा वापर करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.परंतु, खालील परिस्थितींमध्ये अतिरिक्त शुल्क आकारले जाऊ शकते:

- कार्ड रिप्लेसमेन्ट शुल्क: हरवलेले / गहाळ झालेल्या कार्डासाठी रू.१५०/–. तांत्रिक समस्यांमुळे कार्ड प्रत्येक घटनेनुसार मोफत रिप्लेस करण्यात येईल.
- अपुरा निधी शुल्क:  पुरेशी शिल्लक नसल्यामुळे नाकारलेल्या प्रत्येक व्यवहारासाठी रू.२
- इनॲक्टिवेट कार्ड शुल्क
    - मील पास / रेस्टो पास / कॅफेटेरिया पास – खालील बाबतीत रू. २०/–
- ९० दिवसांच्या कालावधीसाठी कार्डवर कोणतेही क्रेडिट नाही
  आणि
- ९० दिवसांच्या कालावधीत कोणताही कार्ड व्यवहार नाही

**१३. मी माझ्या सोडेक्सो मील पासचा उपयोग करून काय खरेदी करू शकेन?**

सोडेक्सो मील पासचा उपयोग सोडेक्सोशी संलग्न व्यापारी आउटलेटमध्ये अन्न आणि नॉन–अल्कोहोलची पेये खरेदी करण्यासाठी करता येऊ शकतो.

**१४. मी होम डिलिव्हरी साठी पैसे देण्यासाठी माझ्या सॉडेक्सो मील पासचा उपयोग करू शकेन का?**

तुम्ही ज्या मर्चन्ट कडून खरेदी करत आहात तो जर होम डिलिव्हरी देण्यास समर्थ असेल तर तुम्ही होम डिलिव्हरीसाठी पैसे भरण्यासाठी तुमच्या सोडेक्सो मील पासचा उपयोग करू शकता.

**१५. मी ऑनलाइन खरेदीसाठी माझ्या सोडेक्सो मील पासचा वापर करू शकेन का?**

तुमच्या सोडेक्सो मील पासचा उपयोग अन्न आणि नॉन–अल्कोहोलची पेये खरेदी करण्यासाठी करता येऊ शकतो. सध्या, हे निवडक लोकपिय ऑनलाइन फुड मर्चन्टपाशीच कार्यान्वित करण्यात आले आहे.

**१६. मला सॉडेक्सो मील पास स्वीकारणाऱ्या आउटलेटची यादी कोठे मिळू शकेल?**

- मर्चन्ट डिरेक्टरी शोधण्याते दोन मार्ग आहेत:
    - झेटा मोबाईल ॲप डाउनलोड करा आणि सोडेक्सो मर्चंट आउटलेटची सूची पाहण्यासाठी ‘मर्चंट लिस्ट’ वर क्लिक करा.
    - सोडेक्सो मर्चंट डिरेक्टरी http://sodexo.live/directory वर मिळवा.

**१७. मी माझ्या सोडेक्सो मील पासचा उपयोग करून पैसे काढू शकतो का?**

नाही. कायद्यानुसार, हे कार्ड फक्त अन्न आणि नॉन–अल्कोहोलिक पेये खरेदी करण्यासाठी वापरता येऊ शकते.

**१८. झेटा ॲपचा वापर करुन पैसे भरण्याच्या विविध पद्धती कोणत्या आहेत?**

झेटा ॲपचा वापर करुन पैसे भरण्याचे विविध मार्ग खालीलपमाणे आहेत:

- **झेटा कोड –** ‘‘झेटा कोड‘‘ वर क्लिक करा, स्क्रीनवर टॅपकरून ओटीपी जनरेट करा, पैसे भरण्यासाठी विक्रेत्याला ओटीपी द्या आणि आपले काम पूर्ण झाले आहे! तुमच्या खरेदीसाठी तात्काळ पावती मिळवा.
- **क्यूआर कोड –** फक्त मर्चन्ट आउटलेटवर क्यूआर कोड स्कॅन करा आणि ३ सेकंदांपेक्षा कमी काळात देय रक्कम पंच करा.
- **दुकानाची आयडी –** व्यापाऱ्याच्या दुकानाची दुकान आयडी नमूद करा आणि रक्कम भरा.

कृपया लक्षात ठेवा की उपयुक्त पैसे भरण्याच्या पद्धतींचा वापर केवळ अशा व्यापारी आउटलेटसवर करता येऊ शकतो ज्या ठिकाणी अशा प्रकारे पैसे स्वीकारण्याची सोय आहे आणि सोडेक्सो–संलग्न व्यापारी आउटलेटमध्ये ती उपलब्ध होणार नाही.

**१९. केवायसी नोंदणी काय आहे?**

आपल्या ग्राहकांची माहिती मिळवा (केवायसी) ही आपल्या ग्राहकांची (सोडेक्सो कार्डधारक) ओळख आणि पडताळणी करण्याची व्यवसाय (सोडेक्सो) पक्रिया आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) केवायसी मार्गदर्शक प्रणाली जारी केली आहे. आरबीआयच्या प्रमुख निर्देशानुसार, सर्व पीपेड इन्स्ट्रुमेंट जारीकर्त्यांसाठी केवायसी पूर्ण करणे बंधनकारक आहे. सध्या सोडेक्सो द्वारा कार्ड ॲक्टिवेशन करताना केवायसी माहिती घेतली जाते.

**२०. सोडेक्सो मेला पासवर लोड करण्याच्या रकमेवर काही मर्यादा आहे का?**

आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये पीपेड कार्डावर जारी केलेल्या काही मूल्यांसाठी ग्राहकाची माहिती मिळविणे आणि ती पमाणित करण्यासाठी काही तत्व नमूद करण्यात आली आहेत. कार्ड ॲक्टिवेट करण्याच्या वेळी सोडेक्सो द्वारा केवायसी तपशील घेतला जातो – ग्राहकाचा किमान तपशील (बंधनकारक) आणि संपूर्ण केवायसी (वैकल्पिक).

- वापरकर्त्याने किमान तपशील दिल्यास खालील नियम लागू असतील:
  - कार्डावरील शिल्लक (कोणत्याही वेळी) ≤ रु.१०,०००*
  - दरमहा संचयी क्रेडिट ≤ रु.१०,०००*
  - दरमहा संचयी डेबिट ≤ रु.१०,०००*
  - प्रत्येक आर्थिक वर्षासाठी संचयी भार ≤ रु.१,००,०००*

कार्ड जारी केल्याच्या तारखेपासून १२ महिन्यांच्या आत, उपयोगकर्त्याला केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे, तसे न केल्यास, कार्डवर अधिक क्रेडिटची परवानगी दिली जाणार नाही.

एकदा उपयोगकर्त्याने केवायसी ग्राहक पूर्ण केले की कार्डावर रू.१,००,०००* पर्यंत रक्कम जमा करता येईल.

***टीप:** ही मर्यादा आरबीआयने निश्चित केली आहे आणि आरबीआयद्वारा त्यात जसे आणि जेव्हा बदल केले जातील तेव्हा ते त्याच्या अधीन असतील.

**२१. मी कार्डचा पिन कसा बदलू?**

तुम्ही तुमच्या स्मार्टफोन किंवा डेस्कटॉपवर उपलब्ध असलेल्या झेटा ॲपद्वारे कार्डचा पिन बदलू शकता.

**२२. जर मी कार्ड पिन विसरल्यास मी काय करावे?**

आपण आपल्या स्मार्टफोन किंवा डेस्कटॉपवर झेटा ॲप वापरून किंवा व्यवहारासाठी डायनॅमिक सुपरपिन वापरून एक नवीन कार्ड पिन जनरेट करू शकता.

**२३. मी माझ्या सोडेक्सो मील पासवरील शिल्लक कशी तपासून पाहू?**

पत्येक वेळी तुम्ही जेव्हा खरेदी करता तेव्हा तुम्हाला कार्डाची ताजी शिल्लक दर्शविणारा ईमेल / एसएमएस सूचना मिळेल. तुम्ही तुमच्या स्मार्टफोन किंवा डेस्कटॉपवरील झेटा ॲपवर देखील कार्डातील शिल्लक पाहू शकता.

**२४. मी माझ्या सोडेक्सो मील पासची सुरक्षा कशी सुनिश्चित करू?**

तुम्ही पैसे भरण्यासाठी झेटा ॲप वापरत असल्यास, तुमच्या मील पासचा दुरूपयोग केला जाणार नाही याची आपण खात्री बाळगू शकता. आमच्या ॲपमधील सिक्युअरशिल्ड वैशिष्ट्यांमुळे आम्ही आपल्या हाती सुरक्षा दिली आहे. सिक्युअरशिल्डमध्ये खालील गोष्टी समाविष्ट आहेत:

सुपरपिन – डायनामिक पिन जो केवळ एका व्यवहारासाठी वैध आहे

स्वाइप२पे – स्वाइप२पे सह, तुमचा ऑनलाइन व्यवहार पूर्ण करण्यासाठी फक्त तुमच्या फोनवर झेटाद्वारे देण्यात आलेल्या सिक्युअर ड़ायलॉगवर स्वाइपकरा. हे पूर्णपणे सुरक्षित, जलद आणि सोयीस्कर आहे.

कार्डाचा गैरवापर केला जाणार नाही याची काळजी घेण्यासाठी, कोणालाही पिन देऊ नका आणि कार्ड पिन व कार्ड एकाच ठिकाणी ठेवू नका. तुमचे कार्ड हरवल्यास, कृपया कार्डाचा दुरूपयोग टाळण्यासाठी तुमचे कार्ड लवकरात लवकर ब्लॉक करा. तुमह्ी झेटा मोबाईल ॲपद्वारे तुमचे कार्ड ब्लॉक आणि अनब्लॉक करू शकता.

**२५. माझा सॉडिक्सो मील पास हरवला किंवा चोरीला गेला तर मी काय करावे?**

कार्ड हरवल्यास तुम्ही झेटा ॲपचा वापर करुन फक्त एका क्लिकने तुमचे कार्ड सहज ब्लॉक करू शकता. तुमचे झेटा ॲप उघडा, 'सेटिंग्ज' वर जा, तुमच्या 'सोडेक्सो मील पास' वर क्लिक करा आणि तुमच्या कार्डावरील व्यवहार बंद करण्यासाठी 'तात्पुरते ब्लॉक' बटण चालू करा. तुम्ही सोडेक्सो ग्राहक सेवा संघाशी देखील संपर्क साधू पर्यंत पोहोचू शकता. हरवलेले कार्ड ब्लॉक करण्यात येईल आणि कार्डधारकाने रिप्लेसमेन्ट कार्डासाठी विनंती केल्यानंतर कार्डधारकांला उपलब्ध रक्कम रिप्लेसमेन्ट कार्डमध्ये देण्यात येईल. तुम्ही डेस्कटॉप इंटरफेसवर लॉग इन करुन देखील रिप्लेसमेन्ट कार्डसाठी विनंती पाठवू शकता.

**२६. मला रिप्लेसमेन्ट कार्डसाठी शुल्क आकारले जाईल का?**

होय, तुमच्या स्वागत पत्रांमध्ये नमूद केल्यापमाणे तुम्हाला कार्ड रिप्लेसमेन्ट शुल्क आकारण्यात येईल.

**२७. मी माझ्या नेटवर्कमध्ये माझ्या निवडीची आउटलेट समाविष्ट करू शकेन का?**

कृपया तुमच्या आवडत्या आउटलेटचे तपशील http://sodexo.live/suggest-us येथे द्या. सोडेक्सो नेटवर्कमध्ये तुमच्या आउटलेटचा समावेश करण्याचा पयत्न करेल.

**२८. सोडेक्सो मील पासवर काही निष्क्रिय शुल्क आहे काय?**

होय, कार्डावर ९० दिवसांच्या कालावधीत क्रेडिट / डेबिट व्यवहार न केल्यास आपल्या स्वागत पत्रात नमूद केल्यानुसार कार्ड निष्क्रिय शुल्क आकारण्यात येईल.

**२९. सोडेक्सो मेला पासवर काही इतर शुल्क आहेत का?**

होय, तुमच्या स्वागत पत्रांमध्ये नमूद केल्यापमाणे पुरसा निधी शिल्लक नसल्यामुळे नाकारलेल्या पत्येक व्यवहारासाठी अपर्याप्त निधी शुल्क आकारण्यात येईल.

**३०. मी माझा सोडेक्सो मील पास ब्लॉक / अनब्लॉक कसा करू?**

तुम्ही आमच्या ग्राहक सेवा केंद्रावर कॉल करुन किंवा आम्हाला consumer@india.sodexo.com येथे ई–मेल पाठवून (टीएटी–२ कामाचे दिवस) तुमचे कार्ड ब्लॉक करू शकता किंवा झेटा ॲपला भेट देऊन तुमचे ब्लॉक / रिप्लेस करू शकता.

**३१. सोडेक्सो नेटवर्कमध्ये माझ्या निवडीची आउटलेट समाविष्ट करू शकेन का?**

कृपया तुमच्या आवडत्या आउटलेटचे तपशील http://www.sodexobenefitsindia.com/users/#find-and-suggest-outlet येथे द्या. सोडेक्सो नेटवर्कमध्ये तुमच्या आउटलेटचा समावेश करण्याचा पयत्न करेल.